**नियमित दिवाणी दावा क्रमांक ६१२/२०२४ मधील निशाणी ०५ वरील आदेश**

(सी.एन.आर क्र.MHAH08-001322-2024)

*(तान्हाजी घुले विरुद्ध धोंडीभाउ खंडु घुले इतर)*

अर्ज व सोबतचे प्रतिज्ञापत्र, दाखल कागदपत्रे पडताळली. अर्जातील कथने व मागणी विचारात घेता, सदर दावा वादी यांनी वाटपासाठी, बक्षीस पत्र रद्द करुन मिळण्यासाठी व जाहीर ठरावासाठी दाखल केला असून दाव्याचा निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सदर मिळकतीचे परस्पर विक्री, हस्तांतरण करु नये अशी अंतरीम तूर्तातूर्त ताकीद प्रतिवादी क्र.१ व २ यांना देणेत यावी अशी विनंती केली. परंतु, प्रस्तूत दावा वाटपासाठी दाखल केला असून दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांची एकत्र कुटूंबाची वडिलोपार्जित मिळकत असल्याचे वादीचे कथन आहे त्यामुळे सदर मिळकतीबाबत प्रतिवादी क्र.१ व २ यांचे म्हणणे ऐकल्याशिवाय अर्जावर कोणतेही आदेश करणे योग्य व उचित होणार नाही. सबब, अर्ज मंजुर का करु नये, अशी प्रतिवादी क्र.१ यांना **दि.१७/०८/२०२४** रोजीची कारणे दाखवा नोटीस काढावी.

स्वाक्षरीत/-

संगमनेर.

**( श्रीमती एस. बी. ढवळे )**

दि. २०/०७/२०२४.

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, संगमनेर.